खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२२ – २३

### एचआयव्ही जनजागृती अभियान




## एचआयव्ही निर्मूलनासाठी लोकशिक्षणाची गरज : डॉ. गरड

**राजगुरूनगर : पुढारी वृत्तसेवा**

एचआयव्हीबद्दल लोकांच्या मनातील भीती कमी होत चालली असली तरी या आजाराचे रुग्ण आजही समाजात आहेत. एचआयव्ही निर्मूलनासाठी सातत्याने लोकशिक्षणाची गरज असल्याचे प्रतिपादन वैद्यकीय अधीक्षक डॉ. महेंद्र गरड यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, रेड रिबन क्लब व ग्रामीण रुग्णालय चांडोली यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिनानिमित्त आयोजित जनजागृती रॅली व एचआयव्ही तपासणी शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. या वेळी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, ॲड. बाळासाहेब लिंबोरे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. बी. दौंडकर आदी उपस्थित होते.

डॉ. महेंद्र गरड म्हणाले की, योग्य वेळी निदान, प्रभावी उपचार यामुळे एचआयव्हीग्रस्त व्यक्ती सामान्यपणे आयुष्य जगू शकतो. शासकीय रुग्णालयांच्या माध्यमातून या रुग्णांवर मोफत उपचार करण्यात येतात. रासेयो स्वयंसेवकांनी राजगुरुनगर शहरात रॅली काढून पथनाट्य व घोषवाक्याच्या माध्यमातून जनजागृती केली. एचआयव्ही तपासणी शिबिरात सुमारे ४४७ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. ग्रामीण रुग्णालय चांडोली येथील प्रयोगशाळा तंत्रज्ञ अधिकारी अल्ताफ पठाण, सुहाना शेख, दिव्या अहिरे, प्रज्वल बोराडे, आयान शेख यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाचे आयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. गणेश धुमाळ, डॉ. प्रभाकर जगताप, डॉ. कीर्ती नितनवरे आर्दीनी केले.

My Gramin Edition
Dec 2, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**